# GOA PANCHAYAT MAHILA SHAKTI ABHIYAN

## ORGANISES

## Distribution of Covid-19 Items

## Bicholim Block

---

# 'भाजप महिला शक्ती'तर्फे पोलिसांना 'कोविड' साहित्य

डिचोली, ता. २७ (प्रतिनिधी) : 'कोविड' महामारीपासून सुरक्षितता मिळावी, यासाठी भाजपच्या गोवा पंचायत महिला शक्ती अभियान डिचोली गटातर्फे डिचोली पोलिसांना ''कोविड'' प्रतिबंधात्मक साहित्य देण्यात आले आहे.

शनिवारी पोलिस स्थानकात आयोजित एका छोट्याशा कार्यक्रमास मयेचे आमदार प्रवीण झांट्ये यांच्यासह उत्तर गोवा जिल्हा पंचायतीच्या माजी अध्यक्ष अंकिता न्हावेलकर, कारापूर-सर्वणचे सरपंच गोकुळदास सावंत, पंच उज्वला कवळेकर, सुषमा सावंत आणि रेश्मी नाईक तसेच महिला शक्ती अभियानच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. 'कोविड' महामारी संकटातही चोखपणे ड्युटी निभावून पोलिस आपले कर्तव्य पार पाडीत आहेत. असे आमदार प्रवीण झांट्ये यांनी सांगून, ड्युटी सांभाळताना सुरक्षिततेसाठी पोलिसांनीही आवश्यक ती खबरदारी घ्यावी. असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी आमदार श्री. झांट्ये यांच्या हस्ते पोलिसांना कोविड साहित्य वाटण्यात आले.



डिचोली : पोलिस निरीक्षक महेश गडेकर यांच्याकडे 'कोविड' सुरक्षा साहित्य देताना आमदार प्रवीण झांट्ये. सोबत गोकुळदास सावंत, अंकिता न्हावेलकर आणि अन्य. (तुकाराम सावंत)

---

लोकमत

# कोरोनावर मात करण्यासाठी संघटित प्रयत्न हवेत

## डॉ. प्रमोद सावंत; डिचोली महिला शक्ती अभियानातर्फे मास्क, सॅनिटायझरचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**डिचोली** : राज्यातील कोरोनाचे संकट हळूहळू कमी करण्यास आम्हाला यश मिळत आहे. तरीही प्रत्येकाने दक्षता घेणे आवश्यक आहे. सीमांवरही येणाऱ्यांची तपासणी केली जात आहे. कोरोनाला हरवणे ही आम्हा सर्वांची जवाबदारी आहे. आरोग्य खातेही चोख काम करत असून करून कोरोनाला पराभूत करूया, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

डिचोली तालुक्यातील मये, डिचोली व साखळी मतदारसंघांतील आरोग्यकेंद्रे, अग्निशामक दल, पोलीसस्थानके या ठिकाणी काम करून जनसेवा बजावणाऱ्या कामगारांना डिचोली महिला शक्ती अभियानातर्फे मास्क, सॅनिटायझरचे वितरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. सभापती राजेश पाटणेकर, आमदार प्रवीण झांट्ये, जिल्हा पंचायत सदस्य गोपाळ सुर्लकर, अध्यक्ष उन्नती सहस्त्रबुद्धे, सरपंच, पंच व इतर सदस्यांचीही उपस्थिती होती.

सभापती पाटणेकर, आमदार झांट्ये यांनीही यावेळी विचार मांडले. महिला शक्ती अभियान डिचोली गटाच्या उपाध्यक्ष सुषमा सावंत, खजिनदार सालिया गावस, अनुजा मांद्रेकर, प्रशिला गावडे, अंकिता न्हावेलकर यांचीही यावेळी उपस्थिती होती.



मास्क व सॅनिटायझरचे वितरण करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत गोपाळ सुर्लकर, उन्नती सहस्त्रबुद्धे व मान्यवर. (छाया : विशांत वझे)